नियमीत लसीकरण कार्यक्रम व त्याअंतर्गत
राबविण्यात येणा-या विविध मोहिमांची राज्यात
प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य,
जिल्हा/महानगरपालिका लसीकरण कृती
दलाची स्थापना करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः लसीका-२०२४/ई.ऑ.क्र.९७२३०२/५४१/प्र.क्र.१४४ /कु.क.१**

१० वा मजला, बी विंग, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, लो.टि. मार्ग, मुंबई- ४०० ००१
दिनांक:- ०४ मे,२०२६.

**वाचाः**

१) मा. सहसचिव (आरसीएच), आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (लसीकरण विभाग), भारत सरकार यांचे पत्र क्र. टी-१३०११/३८/२०११-सीसी व व्ही, निर्माण भवन, नवी दिल्ली, दिनांक १४ सप्टेंबर २०१२.

२) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता-बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे यांचे पत्र क्र.राकुकका/नियमीत लसीकरण कक्ष/कक्ष-१२/राज्य, जिल्हा व मनपा लसीकरण कृती दल स्थापना/ जा.क्र.राकुका/कक्ष-१२/नियमीत लसीकरण/राज्यस्तरीय टास्क फोर्स समिती स्थापना /खुलासा सादर करणेबाबत/१४५४०-५४४/२६, दिनांकः- ३१/०३/२०२६.

**प्रस्तावना:-**

बाल मृत्यू व बालकांमधील आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी बालकांचे योग्य वयात संपूर्ण लसीकरण करणे ही अत्यंत सोपी, कमी खर्चाची पण अत्यंत प्रभावी उपाययोजना आहे. बालकामधील आजारपणाचे प्रमाण कमी करण्यासाठी लसीकरण हे प्रभावी साधन आहे. सर्व बालकांचे पूर्ण लसीकरण करून घेण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात वेळोवेळी विविध लसीकरण मोहीमा राबविण्यात येतात. याकरिता शासनाच्या इतर संबंधीत विभागांचा सक्रिय सहभाग व सहकार्य अत्यंत आवश्यक आहे.

त्यानुसार राज्यात नियमित लसीकरण कार्यक्रमाचे बळकटीकरण करण्यासाठी नियमीत लसीकरण कार्यक्रम व त्याअंतर्गत मोहिमांच्या कामाचा आढावा घेण्यासाठी व त्यांच्या अंमलबजावणीतील अडचणी शोधून त्यावर उपाययोजना करण्यासाठी वाचा-१ येथील मार्गदर्शक सूचनेनुसार मा. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्य लसीकरण कृती दलाची आणि मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा लसीकरण कृती दलाची स्थापना करण्याबाबतच्या सूचना प्राप्त आहेत. त्यानुसार राज्य, जिल्हा तसेच राज्यातील शहरी भागाचे कार्यक्षेत्र मोठे असल्याने व महानगरपालिकास्तरावरुन आरोग्याशी संबंधीत कार्यक्रम राबविण्यात येत असल्यामुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी मा. आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका लसीकरण कृती दलाची स्थापना करण्याबाबत वाचा-२ येथील पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त

आहे. त्यानुसार राज्य, जिल्हा व महानगरपालिका लसीकरण कृती दलाची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णयः-**

केंद्र शासनाच्या वाचा-१ येथील मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात नियमित लसीकरण कार्यक्रमाचे बळकटीकरण करण्यासाठी नियमीत लसीकरण कार्यक्रम व त्याअंतर्गत मोहिमांच्या कामाचा आढावा घेण्यासाठी व त्यांच्या अंमलबजावणीतील अडचणी शोधून त्यावर उपाययोजना करण्यासाठी पुढीलप्रमाणे राज्य लसीकरण कृती दल, जिल्हा लसीकरण कृती दल व महानगरपालिका लसीकरण कृती दलाची स्थापन करण्यात येत आहे. सदर राज्य, जिल्हा व महानगरपालिका लसीकरण कृती दलाचे सदस्य पुढीलप्रमाणे असतील,

**(अ)राज्यस्तरीय लसीकरण कृती दलः-**

| अ.क्र. | पदनाम | सदस्यत्वाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई. | **अध्यक्ष** |
| २ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग,मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ६ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग,मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ८ | आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ९ | आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्तालय, मुंबई. | सदस्य |
| १० | आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे. | सदस्य |
| ११ | आयुक्त, एकात्मिक बाल विकास परियोजना, नवी मुंबई. | सदस्य |
| १२ | महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. | सदस्य |
| १३ | संचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई. | सदस्य |
| १४ | संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे. | सदस्य |
| १५ | संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई. | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १६ | संचालक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई. | सदस्य |
| १७ | संचालक, शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक), शिक्षण आयुक्तालय, पुणे. | सदस्य |
| १८ | उपसंचालक, आरोग्य सेवा (वि.ल.टो), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे. | सदस्य |
| १९ | उपसंचालक, आरोग्य सेवा, माहिती व जनसंपर्क कार्यालय, पुणे. | सदस्य |
| २० | उपसंचालक, आरोग्य सेवा, परिवहन, पुणे. | सदस्य |
| २१ | उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे (सर्व). | सदस्य |
| २२ | राज्य सर्वेक्षण अधिकारी, आय.डी.एस.पी, पुणे. | सदस्य |
| २३ | सहाय्यक संचालक, नियमित लसीकरण, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे. | सदस्य |
| २४ | राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई. | सदस्य |
| २५ | राज्य शीत साखळी अधिकारी, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे. | सदस्य |
| २६ | अध्यक्ष , आय.ए.पी व आय एम ए, महाराष्ट्र राज्य. | सदस्य |
| २७ | जागतिक आरोग्य संघटना, जेएसआय, युएनडीपी, युनिसेफ व इतर यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| २८ | धार्मिक व सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी (NGO). | सदस्य |
| २९ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे. | सदस्य सचिव |

**राज्य लसीकरण कृती दलाची कार्यकक्षा:-**

१) जिल्हा व महानगरपालिका लसीकरण कृती दलांच्या बैठका विहीत कालावधीत व नियमीत होतात किंवा नाही याचा आढावा घेणे.

२) नियमीत लसीकरण कार्यक्रम व त्याअंतर्गत मोहिमांचा व लसीकरणामुळे टाळता येणा-या आजारांचा सविस्तर आढावा घेणे.

३) जिल्हा/मनपा तसेच उपजिल्हा स्तरावरील रिक्त पदे, शितसाखळी उपकरणे व इतर साधसामुग्री आणि प्रशिक्षणाची स्थिती याचा अतिजोखमीचे जिल्हे/महानगरपालिका केंद्रित आढावा घेणे.

४) सर्व सामान्य जनतेमध्ये लसीकरणाची गरज निर्माण करणे व त्यांचा लसीकरणामध्ये सक्रिय सहभाग नोंदविणे यासाठी राज्य तसेच जिल्हा स्तरावरुन राबविण्यात येणा-या विविध प्रचार, प्रसार व प्रसिध्दीचा आढावा घेणे.

५) नियमीत लसीकरणाशी संबंधीत निधी वितरण व खर्चाचा तपशील याचा आढावा घेणे.

६) जिल्हा व महानगरपालिका लसीकरण कृती दलाच्या इतिवृत्ताच्या अहवालानुसार तसेच राज्यस्तरावरुन केलेल्या संनियंत्रणाच्या अहवालाच्या अनुषंगाने जबाबदार अधिका-यांमार्फत योग्य व विहीत कालावधीत कार्यवाही सुनिश्चित करणे.

७) नियमीत लसीकरण व त्याअंतर्गत राबविण्यात येणा-या विविध मोहिमांमध्ये शासनाच्या इतर संबंधीत विभागाचा सक्रिय सहभाग नोंदविणे.

८) मागील राज्य लसीकरण कृती दलाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अनुपालन अहवालाचा आढावा घेणे.

**सूचना:-**

१) राज्य लसीकरण कृती दलाची बैठक दरमहा घेण्यात यावी.

२) राज्य लसीकरण कृती दलाच्या बैठकीची विषयसूची बैठकीच्या सूचनेच्या पत्रासोबत सर्व सदस्यांना पाठविण्यात यावी.

३) सदस्य सचिवांनी राज्य लसीकरण कृती दलाच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त मा. अतिरिक्त सचिव व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांना प्रत्येक बैठकीनंतर सादर करावे.

**(ब)जिल्हास्तरीय लसीकरण कृती दल:-**

| अ.क्र. | पदनाम | सदस्यत्वाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय | **अध्यक्ष** |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सह-अध्यक्ष |
| ३ | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय | सदस्य |
| ४ | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| ५ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम पंचायत, जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल विकास, जिल्हा परिषद | सदस्य |
| ७ | जिल्हा शिक्षण अधिकारी, प्राथमिक व माध्यमिक, जिल्हा परिषद | सदस्य |
| ८ | सहाय्यक संचालक (वैद्यकिय), उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ (संबंधीत) | सदस्य |
| ९ | जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| १० | सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी/जिल्हा सर्वेक्षण अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ११ | निवासी वैद्यकिय अधिकारी (बाहय संपर्क), जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय | सदस्य |
| १२ | अधिष्ठता, वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय किंवा त्यांचे प्रतिनिधी (उपलब्धतेनुसार) | सदस्य |
| १३ | वैद्यकिय अधिकारी, नगरपालिका/नगर परिषद/नगरपंचायत | सदस्य |
| १४ | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान | सदस्य |
| १५ | जिल्हा लेखा व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान | सदस्य |
| १६ | अध्यक्ष, आय.ए.पी. व आय.एम.ए. संघटना, जिल्हा | सदस्य |
| १७ | जागतिक आरोग्य संघटना, जेएसआय, युएनडीपी, युनिसेफ व इतर यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १८ | सार्वजनिक आरोग्य परिचारिका, जिल्हा परिषद | सदस्य |
| १९ | धार्मिक व सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी (NGO) (गरजेनुसार) | सदस्य |
| २० | कार्यकारी/ वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | सदस्य |
| २१ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | **सदस्य सचिव** |

**(क) महानगरपालिकास्तरीय लसीकरण कृती दल:-**

| अ.क्र. | पदनाम | सदस्यत्वाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | आयुक्त, महानगरपालिका | **अध्यक्ष** |
| २ | अतिरिक्त आयुक्त/सहआयुक्त/उपायुक्त (आरोग्य), महानगरपालिका | सदस्य |
| ३ | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय | सदस्य |
| ४ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५ | शिक्षणाधिकारी, महानगरपालिका | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६ | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| ७ | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य |
| ८ | सह कार्यकारी/उप कार्यकारी आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (उपलब्धतेनुसार) | सदस्य |
| ९ | प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | सदस्य |
| १० | सहाय्यक आरोग्य अधिकारी, लसीकरण/प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | सदस्य |
| ११ | अधिष्ठाता, वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय किंवा त्यांचे प्रतिनिधी (उपलब्धतेनुसार) | सदस्य |
| १२ | शहर कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान | सदस्य |
| १३ | शहर लेखा व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान | सदस्य |
| ११ | अध्यक्ष, आय.ए.पी. व आय.एम.ए. संघटना, शहर | सदस्य |
| १४ | जागतिक आरोग्य संघटना, जेएसआय, युएनडीपी, युनिसेफ व इतर यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १५ | सार्वजनिक आरोग्य परिचारिका, महानगरपालिका | सदस्य |
| १६ | धार्मिक व सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी (NGO) (गरजेनुसार) | सदस्य |
| १७ | कार्यकारी/वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | **सदस्य सचिव** |

**<u>जिल्हा/महानगरपालिका लसीकरण कृती दलाची कार्यकक्षा:-</u>**

१) नियमीत लसीकरण कार्यक्रम व त्याअंतर्गत मोहिमांचा व लसीकरणामुळे टाळता येणा-या आजारांचा तालुका व वार्डनिहाय सविस्तर आढावा घेणे.

२) नियमीत लसीकरणाच्या सुक्ष्म कृती आराखडयाचा (Micro-Plan) दर्जा, लसीकरणापासून वंचित बालकांचे लसीकरण करण्यासाठी करण्यात आलेला पाठपुरावा, बालकांना लसीकरण सेवा सत्राच्या ठिकाणी आणण्यासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न, रिक्त असलेल्या उपकेंद्रातील पर्यायी व्यवस्था, शितसाखळी उपकरणे व इतर साधसामुग्री आणि प्रशिक्षणाची स्थिती याचा अतिजोखमीचे कार्यक्षेत्र केंद्रित आढावा घेणे.

३) सर्व सामान्य जनतेमध्ये लसीकरणाची गरज निर्माण करणे व त्यांचा लसीकरणामध्ये सक्रिय सहभाग नोंदविणे यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

४) नियमीत लसीकरण कार्यक्रमांतर्गत दिल्या जाणा-या लसीच्या विविध निर्देशांकात झालेल्या कामाचा व त्याच्या दर्जाच्या संनियंत्रण अहवालानुसार मिळालेल्या माहितीनुसार योग्य व विहीत कालावधीत संबंधीतांमार्फत कार्यवाही सुनिश्चित करणे.

५) नियमीत लसीकरण व त्याअंतर्गत राबविण्यात येणा-या विविध मोहिमांमध्ये शासनाच्या इतर संबंधीत विभागाचा सक्रिय सहभाग नोंदविणे.

६) मागील जिल्हा/महानगरपालिका लसीकरण कृती दलाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अनुपालन अहवालाचा आढावा घेणे.

**सूचना:-**

१) जिल्हा/महानगरपालिका लसीकरण कृती दलाची बैठक दरमहा घेण्यात यावी.

२) जिल्हा/महानगरपालिका लसीकरण कृती दलाच्या बैठकीची विषयसूची बैठकीच्या सूचनेच्या पत्रासोबत सर्व सदस्यांना पाठविण्यात यावी.

३) जिल्हा/महानगरपालिका लसीकरण कृती दलाच्या सदस्य सचिवांनी जिल्हा/महानगरपालिका लसीकरण कृती दलाच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता-बाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे यांना बैठकीनंतर एका आठवडयाच्या आत सादर करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०५०४१०३४१५९३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VAIBHAV
GAJANAN KOSHTI

Digitally signed by VAIBHAV GAJANAN KOSHTI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=5749DF8E46703E97E25555AFE696D0A51BADFA2373CCDC83593E18AF18E92F1A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47C0ABB5437C6B09C621CCA6C499475684F37EA0F5529DD3EF3D6E6B3326E747, cn=VAIBHAV GAJANAN KOSHTI
Date: 2026.05.04 11:54:24 +05'30'

( वैभव ग. कोष्टी )

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (सर्व विभाग), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री (सा.आ.वि.), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई.
८) मा. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१०) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्तालय, मुंबई.
१२) आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.
१३) आयुक्त, एकात्मिक बाल विकास परियोजना, नवी मुंबई.
१४) सर्व आयुक्त, महानगरपालिका
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१७) संचालक (रुग्णालय व प्राथमिक), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई/पुणे.
१८) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
१९) संचालक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
२०) संचालक, शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक), शिक्षण आयुक्तालय, पुणे.
२१) सर्व अधिष्ठाता, वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय किंवा त्यांचे प्रतिनिधी.
२२) अध्यक्ष , आय.ए.पी व आय एम ए, महाराष्ट्र राज्य.
२३) जागतिक आरोग्य संघटना, जेएसआय, युएनडीपी, युनिसेफ व इतर यांचे प्रतिनिधी.
२४) धार्मिक व सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी (NGO).
२५) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता-बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.
२६) निवड नस्ती (कु.क.१)